|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## निवडणूक शाखा

# जाहीर निवेदन

**विषयः- नोंदणीकृत पदवीधर गटामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी तात्पुरती मतदार यादी (Provisional Electoral Roll) प्रसिध्द करण्याबाबत ......**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम २८ (२) (न) नुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने संदर्भीय जाहीर प्रकटन, निवेदन प्रसिध्द केल्यानंतर अधिसूचना क्र. ०५/२०२२ व ०६/२०२२ अन्वये नोंदणीकृत पदवीधर निर्वाचक गणात नाव नोंदविण्यासाठी पदवीधरांचे अर्ज मागविण्यात आले होते. तसेच सर्व संबंधितांना नोदंणीकृत मतदार यादीत नाव नोंदणी व अर्ज सादर करण्यांस मुदतवाढ मिळण्यासंदर्भात प्राप्त अर्जांचा सकारात्मक विचार करून, वेळोवेळी मुदतवाढ देण्यांत आली होती.

अधिसूचना क्र. ०५ व ०६/२०२२ अन्वये प्राप्त माहितीची छाननी करून नोंदणीकृत पदवीधर गटाने त्यांच्यामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या १० सदस्यांसाठी तात्पुरत्या निर्वाचक गणाची मतदार यादी (Provisional Electoral Roll) विद्यापीठाच्या www.nmu.ac.in संकेतस्थळावर Election Portal मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

उपरोक्त अनुषंगाने सर्व संबंधितांना कळविण्यांत येते की, सदरच्या यादीचे कृपया, अवलोकन करून आपल्या नावासमोर काही **दुरुस्ती / बदल** किंवा काही **हरकत / आक्षेप** असल्यास त्यासंदर्भात आपला लेखी अर्ज, आवश्यक त्या पुरक कागदपत्र/दस्तऐवजांसह **दि. ०८/१२/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या निवडणूक शाखा (कक्ष क्र.४१०) मध्ये प्रत्यक्ष निम्नस्वाक्षरीकर्त्याकडे सादर करावा. विहीत केलेल्या तारखेनंतर व वेळेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

तरी वरील संपुर्ण बाबींची नोंद घेऊन नोंदणीकृत पदवीधर निर्वाचक गणाच्या निवडणूक कामी सर्व संबंधितांनी सहकार्य करावे ही विनंती.

जा.क्र. कबचौउमवि /नि.शा.०२/ ९०/२०२२
दिनांक: ३०/११/२०२२

**(डॉ. विनोद प्र. पाटील)**
कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र.०२५७ २२५७३४८ Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone No. : 0257 2257348 Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : election2022@nmu.ac.in